दाखल तारीख : ०१/०१/२०१८
नोंदणी तारीख : ०१/०१/२०१८
निकाल तारीख : ०४/०३/२०२०
कालावधी : ०२ ०२ ०३
वर्ष महिने दिवस

# परळी वैजनाथ येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, यांचे न्यायालयात

(पीठासीन अधिकारी : **निलेश र. यलमाने**)

**नि. फौ. ख. क्र. ०१/२०१८** **निशाणी क्र. ५४**

**महाराष्ट्र शासन** तर्फे
पो.ठा.अ. परळी शहर पोलिस ठाणे
ता. परळी वैजनाथ, जि. बीड. — **अभियोग पक्ष**

**विरुध्द**

१. **सयद बशरत सयद बाबू,**
वय– ३१ वर्षे, व्यवसाय– निरंक,
रा. फूकटे नगर, परळी वैजनाथ,
ता. परळी वैजनाथ, जि. बीड.

२. **शेख अजिज शेख इस्माईल**
वय २३ वर्ष व्यवसास– निरंक,
रा.मिलींद नगर परळी वै.जि.बीड

३. **शेख गौस शेख अफसर,**
वय २६ वर्ष व्यवसाय– निरंक
रा. बरकत नगर परळी वै, जि.बीड

४. **शेख नासेर शेख अफसर,**
वय २६ वर्षे व्यवसाय – निरंक
रा. बरकत नगर परळी वै.जि.बीड

५. **शेख सलमान शेख अल्लाउदीन ( मयत )**

— **आरोपी**

---

**अभियोक्ता** सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती. संकाये
आरोपीतर्फे श्री. डि.एस.उजगरे वकील

---

**न्यायनिर्णय**
(पारीत दिनांक ०४.०३.२०२०)

आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कायदा कलम ३७९, ५११ नुसार शिक्षेस पात्र असलेल्या गुन्ह्यांकरीता सदरचा खटला चालविणेत आला.

**सरकार पक्षाने दाखल केलेल्या प्रकरणाचा तपशिल पुढीलप्रमाणे:**

**(२)** फिर्यादी बिभीषण हनूमंतराव वडूळकर हे त्यांच्या परीवारासह गट नं ८४ मध्ये स्वत:चे शेतात घर बांधून राहतात दिनांक १६.०६.२०१७ रोजी संध्याकाळी चार वाजताचे सूमारास त्यांचे नोकर अशोक नाईकवाडे हा वायर जोडण्यासाठी गेला असता दाउदपूर येथील पांदण व त्यांचे शेताचे धू—यावर असलेले चंदनाचे झाड अंदाजे १०००/— रु. किमतीचे कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेण्याच्या उदेशाने कापून तेथेच ठेवलेले आहे तसे चोरटयाची करवत सूध्दा तेथेच असल्याची सांगितले. त्यामूळे अज्ञात चोरटयांचा शोध होवून त्यांचे विरुध्द कायदेशीर कार्यवाही करावी म्हणून फिर्यादी यांनी संभाजी नगर परळी वैजनाथ पोलिस स्टेशनला आरोपी विरूध्द फिर्याद दिली.

**(३)** घटनेनंतर फिर्यादीने दिलेल्या फिर्यादवरून संभाजी नगर पोलिस ठाणे येथे गु.र. क्रमांक २९/२०१७, भा.द.वि. कलम ३७९, ५११ भा.द.वी प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आली. गुन्हयाचा तपास पोलीस उपनिरीक्षक श्री. आर. बी. जाधवर यांचेकडे सोपविण्यात आला. तपासा दरम्यान तपासी अधिका—याने साक्षीदारांचे जबाब नोंदविले, पंचा समक्ष घटनस्थळाचा पंचनामा केला. आरोपींना

अटक केली. तपासात आरोपींविरूध्द सबळ पुरावा मिळून आल्याने आरोपी विरूध्द न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

**(४)** आरोपींविरूध्द दोषारोप निशाणी क्रमांक ३५ अन्वये निश्चित केले. आरोपीला दोषारोपातील मजकुर वाचून व समजावून सांगण्यात आला. आरोपींनी दोषाराप नाकारलेला असून त्यांचे म्हणणे निशाणी क्र. ३६ ते ३९ द्वारे मांडलेले आहे. गून्हयात खोटया रित्या गोवण्यात आल्याचे म्हटले आहे. आरोपींचे विरोधात कोणताही गून्हादर्शक पूरावा आलेला नसल्याने निशानी १ वर आदेश पारीत करुन आरोपीचे कलम ३१३ फौजदारी प्रक्रिया सहींते अन्वये निवेदन नोंदविण्यात आलेले नाही.

**(५)** खटल्यातील तथाकथित तथ्यांनुसार निर्णयाकरीता खालील मुद्दे उपस्थित होतात त्या मुद्यांवरील माझे निष्कर्ष खालील कारणांकरीता प्रत्येक मुद्याचे समोर लिहिलेले आहेत.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | अभियोग पक्षाने सिध्द केले काय की, दिनांक १५.०६.२०१७ रोजी २३.०० ते २४.०० वाजे दरम्यान गट क्र. ८४ मधील सटवाईचा मळा नामक शेतातुन दाउतपुर ता. परळी वैजनाथ येथे आरोपींनी त्यांचे चोरी करणेचे उद्देशाने चंदनाचे झाड ही चल मालमत्ता फिर्यादीचे ताब्यातून त्याचे संमती शिवाय अप्रामाणिकपणे घेणेचे उद्देशाने हलविली (चोरी केली) आणि त्यामुळे आरोपींनी भारतीय दंड संहितेचे कलम ३७९ सह कलम ५११ खाली शिक्षेस पात्र | नकारार्थी |

असलेला गुन्हा केला?

२) आदेश काय? अंतिम आदेशाप्रमाणे

## का र ण मि मां सा

**(६)** अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ बिभीषण वडुळकर यांची साक्ष निशाणी क्रमांक ४४ वर, साक्षीदार क्र. २ जप्ती पंच शेख बाबा शेख गुलाब यांची साक्ष निशाणी क्र. ४६ वर, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार क्र.३ अशोक नाईकवाडे यांची साक्ष निशाणी क्र.५१ वर नोंदविण्यात आली आहे. त्यानंतर निशाणी क्र. १ वर अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

**(७)** अभियोग पक्षाने फिर्यादी– बिभीषण वडुळकर यांना साक्षीदार क्र. १ म्हणून निशाणी क्र. ४४ वर तपासले. फिर्यादीने त्याच्या पुराव्यात घटना दोन वर्षापुर्वी बांधावर घडल्याचे सांगितले. सदर दिवशी अज्ञात चोरटयांनी त्यांच्या शेतातील बांधावरील चंदनाचे झाड चोरल्याचे त्यांना त्यांच्या नातेवाईकांकडुन कळाले. त्यानंतर त्यांनी पोलीस ठाण्यात फिर्याद (नि.क्र.४५) दिल्याचे सांगितले. परंतू फिर्याद दिल्यानंतर पोलिसांनी त्यांना कधीही बोलावले नसल्याचे सांगितले. फिर्यादीने सरकार पक्षास सहाय न केल्याने सरकारी अभियोक्ता यांनी फिर्यादीची उलटतपासणी घेतली. परंतू उलटतपासणीत घटनेच्या दिवशी आरोपींनी त्याचे शेतातील चंदनाचे झाडे कापली नसल्याचे सांगितले. तसेच पोलिसांनी पुरवणी जवाब घेतला नसल्याचे सांगितले. फिर्यादीने आरोपींविरूद्ध काहीही सांगितले नसल्याने फिर्यादीचा पुराव्यातुन केवळ त्याचे शेतातून चंदनाचे झाड चोरी गेल्याचे

सिद्ध होते. परंतू आरोपींविरूद्ध कोणतीही गुन्हादर्शक बाब अभिलेखावर आलेली नाही.

**(८)** अभियोग पक्षाने जप्ती पंच शेख बाबा शेख गुलाब यांना साक्षीदार क्र. २ म्हणून निशाणी क्र. ४६ वर तपासले. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षास पुरक साक्ष दिलेली नाही. त्यामुळे सरकारी वकीलांनी न्यायालयाच्या परवानगीने त्याला सुचक प्रश्न विचारले. परंतु आरोपींविरुध्द कोणतीही गुन्हादर्शक बाब अभिलेखावर आली नाही. त्यामुळे सदर साक्षीदाराचा पुरावा अभियोग पक्षास निरूपयोगी ठरतो.

**(९)** अभियोग पक्षाने प्रत्यक्षदर्शी साक्षीदार म्हणुन अशोक नाईकवाडे यांना साक्षीदार क्र.३ म्हणुन नि.क्र.५१ वर तपासले. सदर साक्षीदाराने घटनेबाबत काहीही माहित नसल्याचे सांगितले. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षास पुरक साक्ष दिलेली नाही. त्यामुळे सरकारी वकीलांनी न्यायालयाच्या परवानगीने त्याला सुचक प्रश्न विचारले. परंतु आरोपींविरुध्द कोणतीही गुन्हादर्शक बाब अभिलेखावर आली नाही. त्यामुळे सदर साक्षीदाराचा पुरावा अभियोग पक्षास निरूपयोगी ठरतो.

**(१०)** वरील विवेचनावरून हे स्पष्ट होते की, आरोपीचा तथाकथित घटनेशी संबंध जोडता येईल असा यत्किंचितही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. अशा प्रकारे आरोपींविरूध्द गुन्हा सिध्द होण्यासाठी पुरेसा पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे भारतीय दंड संहितेचे कलम ३७९ सहकलम ५११ या आरोपाचे मुलभुत घटक दर्शविण्यास संशयरहीत साक्षीपुरावा अभिलेखावर आलेला नाही. करीता मुद्दा क्रमांक १ व २ चे उत्तर मी नकारार्थी देत आहे. करीता मुददा क्रमांक ३ चे उत्तरादाखल मी खालीलप्रमाणे

आदेश देतो आहे.

## आदेश

(१) आरोपींची भारतीय दंड विधान कायदा कलम ३७९ सहकलम ५११ प्रमाणे या अपराधातुन फौजदारी प्रक्रिया संहीताचे कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

(२) आरोपींचा वैयक्तीक जातमुचलका व हमीपत्र रद्द करण्यात येते.

(३) कलम ४३७–अ, फौजदारी प्रक्रिया संहिता मधील तरतूदीनुसार आरोपींनी प्रत्येकी रु. ५,०००/– चा वैयक्तीक जातमुचलका व तितक्याच रकमेचा एक ऐपतदार जामिन दयावा.

(४) प्रकरणात जप्त मुददेमाल केबल वायर व लोखंडी करवतीची अपिल कालावधीनंतर जाहिर लिलावाद्वारे विक्री करुन येणारी रक्कम सरकारजमा करण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by Nilesh Ravindra Yalmane
Date: 2020.03.04 17:01:51 +0530

परळी वैजनाथ
दिनांक : ०४.०३.२०२०

(**निलेश र. यलमाने**)
न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग,
परळी वैजनाथ, जि. बीड.